# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

ग्राहक तक्रार क्र. १७अ/२००६/ दिनांक :

१) श्री. मल्लेशाप्पा श्रीशैल मेढीदार,
मु.पो. हळ्ळी, ता.जत, जि. सांगली
तर्फे श्री. एच.डी. खापरे, प्रतिनिधी,
रा.जत, जिल्हा–सांगली.

तक्रारदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु ग्रामीण विभागीय कार्यालय,
विश्रामबाग, सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु उपविभागीय कार्यालय,
जत, जि. कोल्हापूर

४) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु उपविभाग, संख, ता.जत, जि. सांगली.

विरूध्द पक्षकार

**कोरम :–**
१) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) एम.बी. भाजीभाकरे, सदस्य–सचिव

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

(१) श्री मल्लेशाप्पा श्रीशैल मेढीदार, रा.हळ्ळी, ता.जत, यांनी शेती पंपासाठी ५ एच.पी. वीज पुरवठा व्हावा म्हणून २९/१/२००५ रोजी वि.प. यांच्याकडे अर्ज केला होता. तथापि अद्याप वीज पुरवठा झाला नाही म्हणून तक्रारदार यांनी सांगली जिल्हा अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे "क्ष" प्रपत्रामध्ये १४/३/२००६ रोजी तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दिलेला निर्णय मान्य न झाल्याने महाराष्ट्र वीज नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील ६.४ चे तरतुदीनुसार श्री मेढीदार यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर येथे २२/६/२००६ रोजी अनुसूची "अ" मध्ये अर्ज केला आहे. कृषी पंपासाठी वीज पुरवठा मागणी बाबत वि.प. व तक्रारदार यांनी आपले लेखी तसेच तोंडी म्हणणे मांडण्यासाठी दि. ८/८/२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तक्रारदार ग्राहकाच्या वतीने प्रतिनिधी म्हणून श्री खापरे उपस्थित होते. तसेच वैयक्तिक तक्रारदार श्री मेढीदारही उपस्थित होते. संबंधित १ ते ४ वि.प.ही उपस्थित होते.

(२) मंचाकडे दाखल झालेली तक्रार, जोडलेला पत्रव्यवहार तसेच वीज वितरण कंपनीने दाखल केलेली कागदपत्रे यावरून सर्वसाधारण अर्जदाराच्या तक्रारीचे स्वरूप व मागणी खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

१) तक्रारदार ग्राहकाने २९/१/२००५ रोजी शेती पंपासाठी वीज मागणीचा अर्ज करूनही दि २२/६/२००६ रोजी मंचात तक्रार दाखल होईपर्यंत वीज पुरवठा केलेला नाही.

२) तक्रारदाराने सदरची वीज जोडणी ही शासनाच्या "जवाहर विहीर योजनेखाली " मागितली होती.

३) तक्रारदार ग्राहक हा इतर मागासवर्ग (O.B.C.) मधील आहे.

४) तक्रारदार यांनी याकामी १४/३/२००६ रोजी कार्यकारी अभियंता(का.), तथा अध्यक्ष, अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, म.रा.वि.वि.कं लि., मंडल कार्यालय, सांगली, यांच्याकडे नियमानुसार विहीत "क्ष" नमुन्यामध्ये रितसर तक्रार नोंदविली आहे.

५) सदरची तक्रार नोंदवूनही दि. ८/८/२००६ पर्यंत वीज पुरवठा केलेला नाही.

६) महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वितरण परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ अंतर्गत परिशिष्ट "अ" प्रमाणे कृती मानके साध्य करण्यास वितरण कंपनीस अपयश आल्याचे निश्चितीकरण करून वितरण मेन्सचा विस्तार करून द्यावयाचा अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ग्राहकाने करावयाच्या खर्चासंबंधी त्याला कळविण्याचा कालावधी ३० दिवसा एवढा निश्चित केला आहे. यास अनुसरून ग्राहकास वरील बाबींची पूर्तता होण्याच्या (म्हणजेच चलन दिल्या तारखेपर्यंतचा) कालावधीपर्यंत विलंबाच्या प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास रू. १००/- याप्रमाणे ग्राहकाला द्यावयाची भरपाई यांचे निश्चितीकरण करून मिळण्याची मागणी नोंदविली आहे.

(३) वीज वितरण कंपनीच्यावतीने १ ते ४ सर्व वि.प. उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर केलेले नाही तथापि सुनावणीच्यावेळी वीज वितरण कंपनीसमोरील अडचणींचा उल्लेख केला. साहित्य व निधी वेळेवर व प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे वीज पुरवठा करता आला नाही. तथापि तक्रारदार यांना तात्काळ वीज पुरवठा उपलब्ध हवा असल्यास विनियम २००५ मधील कलम ३.३ अन्वये कंपनीकडे अंदाजपत्रकीय रक्कम भरावी अथवा ओ.आर.सी. अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरावी व स्वखर्चाने मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून लाईन उभारणी करावी. सदरची पूर्तता केल्यास तात्काळ वीज जोडणी देता येत असल्याचे तोंडी कथन केले. सुनावणीचेवेळी वि.प. यांनी पुढे असेही सांगितले की तक्रारदाराने वरील तरतुदीनुसार

कोणतीही पूर्तता केली नसल्याने विलंबाबद्दल दंड आकारणीची केलेली मागणी प्रकरणी लागू होत नसल्याने सदरची मागणी फेटाळावी.



(४) अंतर्गत ग्राहक तक्रार निवरण कक्ष, सांगली यांनी त्यांच्याकडे "क्ष" नमुन्यात तक्रार अर्ज दाखल झाल्यावर पत्र क्र. ३७१० दि. निरंक नुसार सहाय्यक अभियंता, संख यांना चलन देण्याची सूचना केल्याचे दाखल कागदावरून दिसून येते तसेच दि. १९/८/२००६ च्या आदेश क्र. ६१७६ मध्ये विनियमातील ३.३ च्या तरतुदीनुसार पूर्तता केल्यास वीज पुरवठा करता येईल व तसे आपण न केल्याने विलंबाबद्दल दंड मागणी लागू होत नसल्याचे नमूद केले आहे

(५) तक्रारीच्या सदर पार्श्वभूमीवर दि. ८/८/२००६ रोजी सुनावणी घेण्यात आली. तक्रारदार ग्राहक व ग्राहक प्रतिनिधी श्री खापरे व वीज वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी म्हणजेच सर्व १ ते ४ वि.प. उपस्थित होते. सुनावणीचेवेळी प्रतिनिधी श्री खापरे यांनी आपले लेखी म्हणणे सादर केले आहे. त्याचा परामर्श खालील प्रमाणे –

१) ग्राहकाचे शेती पंपास विद्युत पुरवठा न केल्यामुळे त्यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षात दि. २१/३/२००६ रोजी तक्रार केल्यानंतर १८/५/२००६ रोजी एस.पी.ए. स्कीम खाली अंदाजपत्रक मंजुर केले. यावरून मूळ मागणी अर्ज दि. २९/१/२००५ पासून अंदाजपत्रक मंजूर दि. १८/५/२००६ पर्यंत म्हणजे तब्बल १६ महिन्यांनी तक्रार केल्यावरच मागणी अर्जास चालना मिळाली.

२) एस.पी.ए. खाली दि. १८/५/२००६ रोजी मंजुरी दिल्यानंतर अर्जदाराने वारंवार मागणी करूनही त्यास चलन दिलेले नाही. परिमंडल पातळीवरील ग्राहक तक्रार निवारण मंचात तक्रार दाखल झाल्यानंतर दि. ८/८/२००६ चे सुनावणीपूर्वी मागील तारीख टाकून तसेच त्याच्यावर खाडाखोड करून, चार दिवसांचाच रक्कम भरण्यास अवधी दिलेला आहे.

३) वीज वितरण कंपनीच्या 'संख' उपविभागातील सहा. अभि. श्री. मैलापूरे यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री खापरे व ग्राहक श्री. मेढीदार यांच्याबरोबर उध्दट वर्तन केलेले आहे.

४) 'संख' उपविभागातील एक ग्राहक श्री. गाढवे यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली, यांची दिशाभूल करून वीज जोडणी घेतली असल्याचे नमूद केले आहे.

५) वीज मागणी अर्ज केल्यापासून म्हणजेच दि. २९/१/२००५ पासून एक महिन्यात 'कोटेशन' देणे आवश्यक होते तथापि दि. २५/७/२००६ तारेखेचे रक्कम भरण्याचे चलन देवून १८ महिने इतका विलंब केला आहे. म्हणून कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरणे विनियम २००५ मधील 'अ' परिशिष्टातील तरतूदीनुसार १००/– रू. प्रति आठवडा किंवा त्याच्या प्रत्येक भागास मिळणे आवशक्य असल्याचे नमूद केले आहे. तथापि अर्जदारास वीज कनेक्शन तात्काळ दिल्यास दंड रक्कमेची मागणी आम्ही मागे घेत असल्याचे त्यांनी सुनावणीवेळी सांगितले.

६) वीज वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी तसेच अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे अध्यक्ष यांनी विद्युत पुरवठा संहिता व इतर अधिनियम २००५ च्या ३.३ अन्वये अंदाजपत्रकातील सर्व रक्कम कंपनीकडे भरल्यास किंवा १५टक्के देखभाल चार्ज भरून अर्जदाराने स्व:खर्चाने काम करून कंपनीस कळविल्यास कृती मानकानुसार वीज जोडणी सत्वर देता येईल यांचा पुर्नउच्चार केला. वरील पूर्तता अर्जदाराने पूर्ण केली नसल्याने दंड मागणी लागू होत नसल्याचे आदेश क्र. ६१७६ दि. १९/८/२००६ ने कळविले आहे.

तक्रारदार व त्यांचे प्रतिनिधी यांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच वीज वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी यांनी सादर केलेले कागदपत्रे व सुनावणीच्या वेळेचे कथन विचारांत घेता प्रकरणी खालील प्रमाणे वस्तु:स्थिती असल्याचे मंचाचे निदर्शनास आले आहे –

१. अर्जदार श्री मेढीदार यांनी शेती पंपास ५ एच.पी. इतक्या वीजेची मागणी नोंदविली आहे. अर्जदार हे इतर मागास प्रवर्गातील (O.B.C.) असून त्यांनी शासनाच्या अनुदानातून 'जवाहर विहीर योजनेखाली' सदर विहिरीचे काम पूर्ण केल्याचे दिसून येते. त्याबाबत त्यांनी छोटे पाटबंधारे उपविभाग, पंचायत समिती, जत यांचेकडील पत्र सोबत जोडले आहे. तसेच सदर विहीरीवर कनेक्शन मिळाल्यावर भागातील नागरिकांना पिण्यासाठी पाणी तसेच जनावरांना पिण्यासाठी पाणी देणार असल्याचे पत्र जोडले आहे. श्री मेढीदार यांनी वीज मागणी साठी दि. २९/०१/२००५ रोजी अर्ज दिला आहे तथापि त्यानंतर त्यांनी लेखी पत्रव्यवहार केलेला दिसून येत नाही 'क्ष' पत्रामध्ये दि. १४/३/२००६ रोजीच मंडल अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार केल्याचे दिसून येते.

२. तक्रारदार यांनी दि. २९/१/२००५ रोजी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी मागणी केल्यानंतर वि.प. यांचेकडून कोणतीही कार्यालयीन वा तांत्रीक बाबींची पूर्तता वा पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही एस.पी.ए. योजनेखाली अर्जदाराचा अर्ज दाखल करून घेतला. तथापि सदरचा अर्ज प्राप्त झाल्यापासून विहीत मुदतीत प्रत्यक्ष पाहणी करून वीज मागणीच्या ठिकाणी वीज भार शिल्लक आहे का ? तेथे किमान व्होल्ट भार मिळतो का ? तसे नसल्यास त्यास नवीन ट्रान्सफॉर्मर बसवावा लागेल का ? त्याचा अंदाजे खर्च किती येईल ? या सर्व तांत्रीक बाबींचा विचार केलेला दिसत नाही. तसेच सदरच्या विहिरीवरील जोडणी ही 'जवाहर विहीर ' योजनेतील असल्याने त्यांची जेष्ठता यादी स्वतंत्र आहे का ? तसेच इतर मागास प्रवर्गासाठी कांही सवलत आहे का ? याचा विचार केलेला दिसत नाही. अंतर्गत कक्ष, सांगली यांच्याकडे अर्जदाराने तक्रार दाखल केल्यावर सोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी अथवा चौकशी जत उपविभागाने केलेली दिसून येत नाही. जत उपविभागाची सन २००४ मध्ये विभागणी होऊन संख व जत असे दोन उपविभाग झाल्याचे दिसून येते. वि.प. यांनी दि. ८/८/२००६ रोजी मंचासमोरील सुनावणीच्यावेळी तोंडी कथनात वीज वितरण कंपनीसमोरील आर्थिक अडचण व मटेरिअलची कमतरता तसेच शासन धोरण याचा उल्लेख करून अंतर्गत कक्ष सांगली यांनी दिलेला निर्णय योग्य असल्याचे सांगितले.

३. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांनी त्यांना दिलेला अधिकाराचा योग्य वापर करून तक्रारदार व वीज वितरण कंपनी यांच्याकडील सर्व कागद व पत्रव्यवहार पाहून तसेच सुनावणी घेवून आदेश देणे योग्य व कायदेशीर होते तथापि त्यांनी सदर कार्यपध्दतीचा अवलंब केला नसल्याचे दिसून येते. अर्जदार वा वीज वितरण कंपनी यांनी केलेल्या मागणी बाबत कायदेशीर तरतूदीचा विचार करून आदेश पारीत करणे योग्य होते. तथापि अंतर्गत कक्ष सांगली यांच्याकडे आपल्या लेखी म्हणण्यात वीज वितरण कंपनीने महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व इतर अटी) अधिनियम

२००५ च्या कलम ३.३ अन्वये अर्जदाराने पूर्तता करावी मागणीचा उल्लेख नसतानाही कक्षाने आपल्या आदेशात वरील ३.३ कलमाच्या तरतुदीचा उल्लेख करून अर्ज फेटाळला आहे.



'जवाहर विहीर' योजनेची उपविभागवार जेष्ठता यादी स्वतंत्रपणे तयार केल्याचे वीज वितरण कंपनीने दाखवून दिलेली नाही. तसेच इतर मागास प्रवर्गासाठी वेगळी सवलत असल्यास तसे जवाहर योजनेस वेगळी आर्थिक मदत याबद्दल कंपनीने उल्लेख केला नाही. कक्षात अर्ज दाखल केल्यावर १९/५/२००६ ला ट्रान्सफॉर्मर व इतर मटेरिअलचे इस्टीमेट मंजूर केलेले दिसून येते. म्हणजेच तब्बल १६ महिन्यांनी इस्टिमेट मंजूर केले. अर्जदारास त्याने भरावयाच्या रकमेचे चलन २५/७/२००६ रोजी दिले त्यावरही सर्वत्र खाडाखोड आहे. मागणी अर्ज केल्यापासून अंतर्गत कक्ष सांगली यांचेकडे तक्रार दाखल होईपर्यंत तसेच त्याहीनंतर म्हणजेच २५/७/२००६ रोजी चलन देईपर्यंत कोठेही ग्राहकाला विनियम २००५ मधील ३.३ कलमातील तरतूदीविषयी कळविलेले दिसून येत नाही. एस.पी.ए. योजेनेखाली मागणी अर्ज नोंदवून घेतलेल्याचे दिसून येते. अर्जदारास वीज वितरण कंपनीने एस.पी.ए योजनेअंतर्गत जोडणी द्यावयास लागणारा अंदाजे कालावधी तसेच विनियम २००५ मधील ३.३ कलम तरतुदींचा पर्याय लेखी स्वरूपात देणे आवश्यक होते. तथापि तसे केल्याचे दिसून येत नाही. मंचासमोरील सुनावणीच्यावेळी ग्राहकाने वीज जोडणी तात्काळ मिळाल्यास भरपाईच्या रकमेची केलेली मागणी मागे घेत असल्याचे सांगितले आहे.

सदस्य–सचिव यांच्या मते अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेला निर्णय हा तक्रारदारांस तांतडीने वीज पुरवठा हवा असल्यास योग्य वाटतो. कारण जवाहर योजने अंतर्गत येणारी कामे पूर्ण होण्याइतका निधी शासनाकडून मिळत नाही व सदर कामाचे स्वरूप हे उच्च दाबाची लाईन रोहित्र व लघु दाबाची लाईन असे असल्यामुळे अधिनियम २००३ चे नियम २.६९ च्या तरतूदी या प्रकरणी लागू पडतात. त्याशिवाय इतर मागासवर्गाकरिता शेती पंप कनेक्शनसाठी कोणतीही वेगळी सवलत देण्यात येत नाही अगर त्यांना अग्रक्रम देण्याची तरतूदही नाही. त्याशिवाय जवाहर वित्तीय योजने अंतर्गत प्रशासकीय मंजुर यादीनुसार श्री. मेढीदार यांचा क्रमांक ८५ वा आहे.

सदर ग्राहकाने ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी पुरविणार असल्याचे तहसीलदार, जत यांचे पत्र सोबत जोडले आहे. परंतू जर सदर विहीर शासनाने अधिग्रहण केली असेल तर सरपंच यांचे नांवावर कनेक्शन दिले जाते. त्यासाठी येणारा संपूर्ण खर्च शासन करते व ते कनेक्शन त्वरित दिले जाते.

श्री मेढीदार यांची विहीर पूर्ण झाल्याचे लघुपाटबंधारे खात्याचे उपअभियंता यांनी वि.प. यांना दि. ३/३/२००६ रोजीचे पत्राने कळविले आहे.

सदर कनेक्शन करिता स्वतंत्र उपकेंद्राची उभारणी करावयाची असल्याने त्याला एक वर्षाचा कालावधी प्रमाणित करणेत आलेला आहे.. सदर अर्जदाराने दि. १६/८/२००६ रोजी चलन भरलेले आहे मात्र चाचणी अहवाल अद्यापही दिलेला दिसत नाही. सबब तक्रारदार यांचा सदर बाबतीतचा अर्ज परिपूर्ण झाल्यानंतर त्यांना एक वर्षामध्ये कनेक्शन देण्यात यावे.

सांगली ग्रामीण विभागापैकी जत व संख उपविभागांतून शेती पंपास वीज पुरवठा करण्याचे कामी मोठया प्रमाणांत तक्रारी आल्याने व कांही कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक वाटल्यामुळे या मंचाला आदेश देण्यास थोडा विलंब झाला आहे.

तक्रारदार व वि.प. यांनी सादर केलेला पुरावा, त्यांनी सुनावणीचेवेळी केलेले कथन व नमुद केलेली वस्तुस्थिती व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतींची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील तरतूदींचा विचार करून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.



# आदेश

१. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली यांनी दि. १९/८/२००६ रोजी (क्र. ६१७६) दिलेला आदेश अंशत: रद्द करण्यांत येत आहे.

२. वीज वितरण कंपनीने मागणी केलेला चाचणी अहवाल दि. २५/७/२००६ च्या चलनावरील रक्कम तसेच इतर कागदपत्रे यांची पूर्तता अर्जदाराने केल्यानंतर एक वर्षाचेआंत तक्रारदार यांचे शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत यावा व त्याबाबत विनियम २००६ चे कलम ८.३ चे तरतुदीनुसार मंचास अहवाल सादर करावा.

३. या निर्णयाबद्दल तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल. तसेच वि.प. यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई, अथवा दिवाणी न्यायालयात करता येईल.

| | | |
|---|---|---|
| (एम.बी.भाजीभाकरे) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |